## एम.बी.मोरे महिला महाविद्यालयात ब्युटीपार्लर कोर्सचा समारोप

रोहा तालुक्यातील धाटाव येथील एम.बी.मोरे फाऊंडेशन संचलित कला वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय येथे महिला सक्षमीकरण कार्यक्रमा अंतर्गत आणि सुदर्शन केमिकल्स लि. कर्वे सामाजिक संस्था पुणे तसेच वसुंधरा कौशल्य विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यामानाने महाविद्यालयात सुरू करण्यात आलेल्या ब्युटीपार्लर प्रशिक्षण या शॉर्ट टर्म कोर्सचे सोमवार दिनांक १७.०२.२०२० रोजी समारोप करण्यात आला. यामध्ये सहभागी विद्यार्थीनींनी प्रशिक्षणामध्ये आत्मसात केलेल्या सौंदर्य कलांचे सादरीकरण केले. या प्रशिक्षणाचा लाभ महाविद्यालयातील कला वाणिज्य व विज्ञान शाखेतील सहभागी ३० विद्यार्थीनींना झाला.

यावेळी या कार्यक्रमामध्ये सुदर्शन केमिकल्स व कर्वे टीम मधील श्री. सुनिल साळुंके सर श्री.राजु घारगे सर कु. कल्पना केंजळे तसेच वसुंधरा कौशल्य विकास संस्थेच्या सौ.कविता कदम सौ शिल्पा शेळके परिक्षक तसेच महाविद्यालयातील प्राचार्य श्री. प्रसन्न म्हसळकर व महिला महाविद्यालयाच्या सर्टीफीकेट कोर्स समन्वयक प्रा.प्रणाली महाडीक आदी उपस्थित होते.